# <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०१८ मधील नि. क्र. १ खालील आदेश</u>

(CNR:MHAH19-000001-2018)

१. अर्जदाराने सदरचा अर्ज हा आयशर टेम्पो नोंदणी क्र. एम.एच.२०/सी.टी.६९९१ हा परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. सदरचा अर्ज वाचला. अर्जासोबतचे अर्जदार यांचे शपथपत्र नि.क्र. २, तपासीक अंमलदार यांचे म्हणणे नि.क्र. ६ नि.क्र. १०, कागदपत्रांची यादी नि.क्र. ५ सोबत एफआयआरची छायांकित प्रत आर्टीकल ए, आयशरची आर.सी.बुकची पडताळणी प्रत नि.क्र. ८, एचडीएफसी इआरजीओ इन्शुरन्स कंपनीच्या इन्शुरन्सची पॉलीसीची पडताळणी प्रत नि.क्र. ९ हे सर्व विचारात घेतले.

३. अर्जदाराचे विधीज्ञ श्री. एल. एच. लांडे यांनी असा युक्तिवाद केला की, शेवगांव पोलीस ठाण्यामध्ये नोंदलेला गु.र.क्र. ४६९/२०१७ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियमचे कलम १८४ या अपराधात पोलीसांनी उपरोक्त आयशर टेम्पो जप्त केलेला आहे. त्याचा नोंदणी क्र. एम.एच.२०/सी.टी.६९९१ हा असून चेसिस क्र. एमसी२३३एचआरसी०डीडी०८२७८३ आणि इंजिन क्र. इ४८३सीडीडीडी६११८६३ हा आहे. अर्जदाराचे विधीज्ञांनी पुढे असा युक्तिवाद केला की, सदरचा आयशर टेम्पो हा अर्जदार गोरख विक्रम चोरमले यांच्या मालकीचा आहे. त्यामुळे सद्यस्थितीत अर्जदार हा आयशर टेम्पो त्याच्या ताब्यात मिळण्यास पात्र आहे. अर्जदारास त्याचे दैनंदिन कामाकरीता आयशर टेम्पोची आवश्यकता आहे. अर्जदार सर्व अटींचे पालन करण्यास तयार आहे. तरी अर्जदारास आयशर टेम्पो परत देण्यात यावा.

४. तपासीक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ६ व १० अन्वये दाखल केले. तपासीक अंमलदार यांचे नि.क्र. ६ अन्वयेच्या म्हणण्यात थोडक्यात म्हणणे असे आहे की, त्या आयशर टेम्पोची तांत्रीक तपासणी झाली नसल्यामुळे तो आयशर टेम्पो मालकाच्या ताब्यात देण्यात येवू नये. त्यानंतर तपासीक अंमलदार यांचे नि.क्र. १० अन्वयेच्या म्हणण्यात थोडक्यात म्हणणे असे आहे की, दिनांक ०३/०१/२०१८ रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे आयशर टेम्पोची तांत्रीक तपासणी झाली आहे. त्यामुळे तो आयशर टेम्पो मालकास पुरेशा अटी व शर्तीवर ताब्यात देण्यास त्यांची काही हरकत नाही.

५. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतच्या प्रकरणात प्राथमिक तपास चालू आहे, तपास पुर्ण व्हायचा आहे तसेच जप्त आयशर टेम्पोची तांत्रीक तपासणी झाल्याशिवाय वाहन सोडण्यात येवू नये.

६. आर.सी.बुकची पडताळणी प्रत नि.क्र.८, इन्शुरन्स पॉलीसीची प्रमाणीत प्रत नि.क्र.९ हे एकत्रितरित्या विचारात घेतले असता अर्जदार हे त्या आयशर टेम्पोचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते.

७. प्रस्तुतचा आयशर टेम्पो हा भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ या गुन्हा रजि. क्र. ४६९/२०१७ या अपराधात जप्त केलेला आहे. एचडीएफसी इआरजीओ इन्शुरन्स कंपनीच्या इन्शुरन्सची पॉलीसीची पडताळणी प्रत नि.क्र. ९ याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्या पॉलीसीत 'थर्ड पार्टी रिस्क' समाविष्ट आहे व सदर पॉलीसीचा कालावधी हा दिनांक ३०/०६/२०१७ रोजीच्या रात्री ००:०१ वाजेपासून ते दिनांक

२९/०६/२०१८ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत लागू आहे.

८. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांमधील आयशर टेम्पोची आर.सी.बुकची प्रमाणीत प्रत नि. क्र. ८, एचडीएफसी इआरजीओ इन्शुरन्स कंपनीच्या इन्शुरन्सची पॉलीसीची पडताळणी प्रत नि.क्र. ९ हे विचारात घेतले तर सद्यस्थितीत अर्जदार त्या आयशर टेम्पोचा ताबा मिळण्यास पात्र ठरतो. प्रस्तुतच्या अर्जदाराव्यतिरिक्त आजतागायत कोणीही त्या आयशर टेम्पोच्या मागणीबाबत हक्क सांगितलेला नाही. उपरोक्त सर्व परिस्थितीत अर्जदार काही अटींवर तो आयशर टेम्पो परत मिळण्यास पात्र असल्याचे दिसून येते.

९. प्रस्तुतच्या प्रकरणात संपुर्ण तपासाअंती आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल होवून त्या प्रकरणाची संपरिक्षा होवून प्रकरण निकाली निघण्यास बराच कालावधी लागणार आहे. या परिस्थितीत जप्त मुद्देमाल आयशर टेम्पो हा पोलीस ठाण्यात तशाच पडून राहिल्यास त्याचे ट्युब, टायर व इंजिन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेतली असता, अर्जदारास काही अटींवर तो आयशर टेम्पो परत देणे योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

(१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) अर्जदाराने रक्कम रूपये १४,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चौदा लाख फक्त) चे हानिरक्षण बंधपत्र तपासीक अंमलदार यांचेकडे दिल्यानंतर, तपासीक अंमलदार यांनी जप्त केलेला आयशर टेम्पो नोंदणी क्र. एम.एच.२०/सी.टी.६९९१ हा नोंदणी क्रमांक स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे छायाचित्रे काढून सविस्तर पंचनामा करुन अर्जदारास परत द्यावा.

(३) अर्जदाराने त्या प्रकरणाची संपरिक्षा पुर्ण होईपर्यंत सदरील आयशर टेम्पोमध्ये कसल्याही स्वरूपाचा बदल न करणे, कोणासही न विकणे, इतर कोणासही गहाण, बक्षीस किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत न करणे या अटींवर तो अर्जदारास परत करण्यात येत आहे.

(४) सदरील आयशर टेम्पो हा न्यायालय सांगेल त्यावेळेस अर्जदार यांनी न्यायालयामध्ये हजर करावयाचा आहे, व तो हजर न केल्यास रक्कम रूपये १०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक हजार फक्त) प्रत्येक तारखेस दंड म्हणून भरावी लागेल.

(५) तपासीक अंमलदार यांनी, अर्जदार यांनी लिहून दिलेले हानिरक्षण बंधपत्र आणि संबंधीत पंचनामा दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

(६) सदर आदेशाची एक प्रत तपासीक अंमलदार यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठवावी.

(धनंजय भ. हंबीरे)

दिनांक : ०५/०१/२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शेवगांव.